# कळवा वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


महाराष्ट्र पोलीस

**पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर**
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९८० /२०२५ दि. २७ /०८/२०२५

## —: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

**ज्याअर्थी, कळवा** वाहतूक उप विभागाचे हद्दीत दिनांक २७/०८/२०२५ ते दिनांक ०६/०९/२०२५ या कालावधीत सार्वजनिक **'गणेशोत्सव'** साजरा होणार आहे. सदर कालावधीत **१) विटावा गणेश घाट, २) शिवाजी चौक गणेश घाट, ३) खारेगाव तलाव गणेश घाट व ४) पारसिक रेतीबंदर – गणेश घाट** या ठिकाणी गणेश मुर्ती विसर्जन होणार असुन विसर्जनाचे ठिकाणी व मिरवणुक मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | **१)** नवी मुंबई बेलापूर रोडने तसेच ऐरोली – पटणी मार्गे विटावा जकात नाका – कळवा शिवाजी चौकातून ठाण्याचे दिशेने येणाऱ्या जड अवजड वाहनांना व टी.एम.टी./एन.एन.एम.टी./एस.टी. व खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसेसना **पटणी** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | **अ)** सदर जड अवजड वाहने पटणी येथुन डावीकडे वळून ऐरोली – मुलूंड – आनंदनगर जकात नाका – पूर्व द्रुतगती महामार्गावरून इच्छित स्थळी जातील. |
| | **ब)** टी.एम.टी./एन.एन.एम.टी./एस.टी. व खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसेस **पटणी** येथे प्रवासी उतरवून तेथूनच प्रवासी भरून परत नवी मुंबई कडे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | २) पूर्व द्रुतगती महामार्ग (रा.म.क्र. ३) वरील गोल्डन डाईज नाका येथून ठाणे शहरातून मिनाताई ठाकरे चौक – जी.पी.ओ. नाका – क्रिक नाका – कळवा मार्गे नवी मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या जड अवजड वाहनांना **गोल्डन डाईज नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने गोल्डन डाईज नाका येथूनच पूर्व द्रुतगती महामार्गवरून कॅडबरी जंक्शन – नितीन कंपनी नाका – तीन हात नाका – कोपरी ब्रिजवरून आनंदनगर नाका – मुलूंड मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **३)** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३, खारेगांव टोलनाका येथून गॅमन जंक्शन – पारसिक सर्कल – मुंब्रा बायपास मार्गे नवी मुंबई दिशेने जाणाऱ्या जड अवजड वाहनांना **खारेगांव टोल नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३, खारेगांव टोल नाका येथून सरळ गोल्डन डाईज नाका – कॅडबरी नाका – नितीन कंपनी नाका – तीन हात नाका – कोपरी ब्रिज – आनंदनगर जकात नाका मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **४)** बाळकुम नाका – साकेत – क्रिक नाका येथून शिवाजी चौक, कळवा च्या दिशेने जाणाऱ्या जड अवजड वाहनांना **बाळकुम नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने बाळकुम – कापूरबावडी नाका – गोल्डन डाईज नाका – कॅडबरी नाका – नितीन कंपनी नाका – तीन हात नाका – कोपरी ब्रिजवरून आनंदनगर जकात नाका मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ५) नवी मुंबई – पनवेल बाजूकडून तसेच कल्याण – मानपाडा – बदलापूर – अंबरनाथ कडून मुंब्रा – ठाणे च्या दिशेने येणाऱ्या जड अवजड वाहनांना **शिळफाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने शिळफाटा येथून महापे रोडने – रबाळे – ऐरोली ब्रिज – मुलूंड – आनंदनगर चेकनाका – पूर्व द्रुतगती महामार्गावरून इच्छित स्थळी जातील. |

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | **६)** शिळफाटा येथून मुंब्रा बायपास मार्गे घोडबंदर रोड – नाशिक बाजूच्या दिशेने येणाऱ्या जड अवजड वाहनांना, **शिळफाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने शिळफाटा येथूनच यु टर्न घेवून परत महापे रोडने – रबाळे – ऐरोली ब्रिज – आनंदनगर चेकनाका – पूर्व द्रुतगती महामार्गवरून इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ७) मुंब्रा बाजूकडून पारसिक सर्कल मार्गे खारेगांव टोलनाका व ठाण्याचे दिशेने येणाऱ्या टी.एम.टी. व खाजगी बसेसना **पारसिक सर्कल** येथे तसेच जड अवजड वाहनांना **शिळफाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरच्या बसेस हया पारसिक सर्कल येथे प्रवासी उतरवून तेथूनच प्रवासी घेवून परत मुंब्रा कडे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ८) घोडबंदर रोड – गोल्डन डाईज नाका – गोल्डन डाईज नाका ओव्हरब्रिज – साकेत ब्रिज – खारेगाव टोलनाका – गॅमन चौक – पारसिक सर्कल – पुढे मुंब्रा व नवी मुंबई करीता कळव्याच्या दिशेने जाणाऱ्या जड अवजड वाहनांना **गोल्डन डाईन नाका** येथे प्रवेश बंद करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने घोडबंदर रोड – गोल्डन डाईज नाका येथूनच ओव्हरब्रिजवर यु टर्न घेऊन कॅडबरी नाका – नितीन कंपनी – तीन हात नाका – कोपरी ब्रिजवरून आनंदनगर जकात नाका मार्गे इच्छित स्थळी जातील. |

**सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दिनांक २८/०८/२०२५ रोजी ( दीड दिवसाचे ), दिनांक ३१/०८/२०२५ रोजी ( पाच दिवसाचे ), दिनांक ०२/०९/२०२५ (गौरी गणपती व सात दिवस ) व दिनांक ०६/०९/२०२५ रोजी ( अनंत चतुर्थी ) या कालावधीत दुपारी १२.०० वा. ते गणपती विसर्जन मिरवणूक संपेपर्यंत अंमलात राहील.**

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मुर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर :–**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१ ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/– म.न.पा. ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.